M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

क्र.मुंविमं/माध्य.परीक्षा/२२२२
वाशी, नवी मुंबई ४००७०३
दिनांक २८.०५.२०२५

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त मुख्याध्यापक ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी,
नवी मुंबई

विषय— माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा जून/जुलै २०२५ परीक्षेबाबत ..

मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई या विभागातील सर्व मान्यता प्राप्त मुख्याध्यापक /प्राचार्य यांना उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा जून/जुलै २०२५ परीक्षा दिनांक २४/६/२०२५ ते दिनांक ०८/०७/२०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. सदर परीक्षेकरिता ऑनलाईन आवेदनपत्र विलंब शुल्कासह भरण्याची अंतिम तारीख २९/०५/२०२५ असून त्याचे परीक्षा शुल्क ऑनलाईन दिनांक ३०/०५/२०२५ पर्यंत मंडळाच्या खाती चलनाव्दारे जमा करावयाचे आहे.

१. सर्व माध्यमिक शाळांनी मंडळाच्या अधिकृत Website व्दारे प्राप्त online चलनावर नमूद केलेल्या ICICI बॅकेच्याVirtual Account मध्ये कोणत्याही बॅकेमधून NEET/RTGS व्दारे चलनाप्रमाणे अचूक शुल्क रक्कमेचा भरणा करण्यात यावा.
२. बॅकेत रक्कम भरणा करण्यात आल्या नंतर आपले सर्व आवेदनपत्राचे स्टेटस पेड आहेत की नाही याची खात्री करण्यात यावी.
३. ऑनलाईन पेमेंट केल्यानंतर सदरची रक्कम आपल्या बॅक खात्यात परत जमा झाली आहे काय याची खात्री करण्यात यावी. रक्कम आपल्या खात्यावर परत जमा झाली असल्यास तात्काळ बॅकत रक्कम भरणा करण्यात यावी.
४. यापूर्वी वापरात असणा—या Bank of India/HDFC Bank/Axis Bank जुन्या चलनांचा वापर करण्यात येवू नये त्याचाप्रमाणे मंडळात रोख स्वरूपात शुल्क स्विकारले जाणार नाही.
५. माध्यमिक शाळांनी सादर केलेली सर्व आवेदनपत्रांचे विहीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.
६. माध्यमिक शाळांनी ऑनलाईन सादर केलेल्या आवेदनपत्राची प्रिलिस्ट, पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांचे जुनी गुणपत्रके, बॅंकत भरणा केलेले परीक्षा शुल्काचे चलन, परीक्षा शुल्क तक्ता, इ. साहित्य दिनांक ०२/०६/२०२५ रोजी हस्तपोहच मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवीमुंबई येथे जमा करण्यात यावीत. कोणत्याही परिस्थितीत संकलन केंद्रावर सदरचे साहित्य स्विकारले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे—पवार)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी.
नवी मुंबई ४००७०३

Telephone : 27652445,27662504,27881077,27881075,27899987 * Fax : 27659491/27881349
Email : sschsc.mumbaiboard@gmail.com * Website : www.sscboardmumbai.in